## निशाणी ५ वरील आदेश (नि.दि.दा.क्र.२४/२०१०)

वादी यांनी प्रस्तुत अर्ज, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याखेरीज अनाधिकारे कब्जा करुन स्मशानभुमीचे काम करु नये, वाद मिळकत दहनविधीसाठी वापरु नये व वादीचे वहिवाटीस बाधा येईल असे कृत्य करु नये अशी तुर्तातूर्त ताकिद मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. मौजे करंदी तर्फ कुडाळ, ता. जावली, जि. सातारा येथील गट नं. ३०९ क्षेत्र ०–६९ ही मिळकत प्रस्तुत अर्जाचा विषय असून, त्यास यापुढे दावा मिळकत असे संबोधले आहे.

३. वादीचे अर्जातील कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे–

दावा मिळकत ही वादी व सुनिलदत्त शामराव यादव यांची खरेदी मालकी हक्काची मिळकत असून, त्यात वादीचा १५ आणे व सुनिलदत्त यादव यांचा १ आणे समाईकातील हिस्सा आहे. दावा मिळकत ही गजबलेल्या ठिकाणी व भर वस्तीत आहे. सुनिलदत्त यादव यांना दावा मिळकतीत स्वारस्य नसल्याने त्यांचा कब्जा नव्हता. संपुर्ण दावा मिळकत वादीचे कब्जेवहिवाटीत आहे. दावा मिळकतीत वादी व सुनिलदत्त यादव यांचेत सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. सुनिलदत्त यादव यांना दावा मिळकतीत स्वारस्य नसल्याने त्यांनी त्यांचे हिश्याची मिळकत तबदील करण्याचे ठरविले. त्यांचा एक आणा हिस्सा विकत घेण्याची तयारी वादीने दर्शविली. परंतू, त्यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी त्यांचा एक आणे हिस्सा बेकायदेशीर व अनाधिकाराने बक्षिसपत्र नावाच्या दस्ताने प्रतिवादी यांना स्मशानभुमी बांधण्यासाठी दिला. सदर बेकायदेशीर दस्ताचे आधारे कोणत्याही फेरफाराशिवाय दावा मिळकत प्रतिवादीचे नावे झाली. खासदार फंडातून करंदी तर्फ कुडाळ या गावासाठी पूर्वीच स्मशानभुमी होवून अंत्यविधीची सोय झाली असताना, स्वार्थी हेतूने

प्रेरीत होवून वादीस त्रास देण्याच्या उद्देशाने प्रतिवादी सदर मिळकतीत स्मशानभुमी बांधणार असल्याचे वादींना सांगितले. दावा मिळकतीत स्मशानभुमी झाल्यास त्यांचे व त्यांचे कुटूंबाचे शारिरीक व मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परीणाम होणार आहे. दावा मिळकत ही स्मशानभुमी बांधण्यासाठी योग्य जागा नाही. त्यामुळे वादीस दावा मिळकतीची वहिवाट सुलभपणे करता येणार नाही. सबब, वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी यांनी नि. ५ येथील अर्जास म्हणणे दाखल केले नाही.

५. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्र यांचे अनुषंगाने पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादी सकृतदर्शनी केस शाबीत करतात काय ? | .. होकारार्थी |
| २. सोईची बाब वादींचे बाजूने आहे काय ? | .. होकारार्थी |
| ३. मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | .. होकारार्थी |
| ४. आदेश काय ? | .. अर्ज मंजूर करणेत आला. |

## कारणमिमांसा

६. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांचे विधिज्ञ यांनी युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, दावा मिळकतीमध्ये वादी व सुनिलदत्त यादव यांचेत सरसनिरस मानाने वाटप झाले नाही. त्यामुळे कथित बक्षिसपत्रात नमुद केलेल्या एक आणे हिश्याच्या

चतुःसीमा कोणत्या आधारे नमुद केल्या हे सिध्द होत नाही. त्यांनी युक्तिवाद केला की, वादी हे दावा मिळकतीचे सहमालक असल्याने संपुर्ण दावा मिळकतीत त्यांचा हक्क आहे व त्यांचे संम्मतीशिवाय दावा मिळकतीचे स्वरुप बदण्याचा प्रतिवादीस हक्क नाही. त्यांनी युक्तिवाद केला की, गावामध्ये पुर्वीच अन्य स्मशानभुमी उपलब्ध असल्याने, दावा मिळकतीत स्मशानभुमी बांधण्याची आवश्यकता नाही. प्रतिवादी यांचे ४ गुंठे क्षेत्र निश्चित कोणते हे सिध्द झाले नसल्याने, प्रतिवादींना दावा मिळकतीत स्मशानभुमी बांधून त्याचे स्वरुप बदलता येणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात यावा असे प्रतिपादन त्यांनी केले.

७. प्रतिवादीचे विधिज्ञ यांनी युक्तिवाद केला की, दिनांक ४.१.२०१० रोजीचे नोंदणीकृत बक्षिसपत्राने दावा मिळकत प्रतिवादीचे मालकीहक्काची झाली आहे. सदर मिळकतीत प्रतिवादी यांचा १ आणे हिस्सा आहे. प्रतिवादी ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने, प्रस्ताव मंजूर झाल्याखेरीज कोणतेही बांधकाम करु शकत नाही. त्यांनी युक्तिवाद केला की, दावा मिळकतीत स्मशानभुमी बांधण्याबाबत कोणताही प्रस्ताव व निधी मंजूर झालेला नाही. प्रतिवादी यांनी स्मशानभुमी बांधण्याचे कोणतेही प्रयोजन निश्चित केलेले नाही. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नसताना, प्रतिवादी यांना दावापुर्व नोटीस न देता प्रस्तुत अर्ज दाखल केला असल्याने तो खर्चासह नामंजूर करण्यात यावा असे प्रतिपादन त्यांनी केले.

**वादप्रश्न क्रमांक १ ते ३ करीताः**–

८. नि. ७ येथील दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पहाता, त्यात वादीचे नाव १५ आणे हिश्यास नोंद आहे. सुनिलदत्त शामराव यादव–हिस्सा १ आणे यास कंस होवून त्याऐवजी प्रतिवादीचे नाव १ आणे हिश्यास भोगवटासदरी नमुद आहे. नि. ३/१ येथील बक्षिसपत्राचे सहीशिक्याचे प्रतीचे

अवलोकन करता, सुनिलदत्त शामराव यादव यांनी दावा मिळकतीतील समाईकातील त्यांचा १ आणेचा हिस्सा उत्तर बाजुचे रस्त्यालगतचा प्रतिवादी यांना सार्वजनिक स्मशानभूमी बांधण्यासाठी दिला असल्याचे दिसून येते. नि. ९ येथील फेरफार उता–याचे अवलोकन करता, सदर फेरफारवरुन बक्षिसपत्राचे आधारे प्रतिवादीचे नावाची नोंद दावा मिळकतीस १ आणे हिश्यास झाली असल्याचे दिसून येते. सदर उता–यात फेरफार क्रमांक नमुद नाही. यावरुन सुनिलदत्त यादव यांनी त्यांचा १ आणे हिस्सा प्रतिवादी यांना बक्षिसपत्राने दिला असल्याचे व त्यामुळे वादी व प्रतिवादी दावा मिळकतीचे समाईकातील सहमालक झाले असल्याचे दिसून येते.

९. नि.८ येथील दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यातील पिकपहाणी कलमाचे अवलोकन करता, त्यात ज्वारी, घेवडा, शाळू अशी पिके येत असल्याचे व त्यात एक देऊळ असल्याचे दिसून येते. नि. ३/३ येथील संम्मतीपत्राचे छायांकीत प्रतीचे अवलोकन करता, श्री बबन गेनदेव निकम, रा. करंदी तर्फ कुडाळ यांनी त्यांच्या मालकीचे गट नं. ३४९ मधील ओढ्यालगतची १ गुंठा जागा खासदार फंडातून मंजूर झालेल्या स्मशानभूमी बांधकामास देत असल्याचे नमुद आहे. सदर संम्मतीपत्र दिनांक १४.१२.२००० रोजीचे आहे. नि. ३/४ येथील छायाचित्राचे अवलोकन करता, त्यात ओढ्यालगत स्मशानभुमीचे बांधकाम झाले असल्याचे दिसून येत आहे. यावरुन करंदी तर्फ कुडाळ या गावात अंत्यविधीकरीता सार्वजनिक स्मशानभुमीचे बांधकाम पूर्वीच झाले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. नि. ४५/१ येथे वादी यांनी उप लोकायुक्त यांचेसमोर झालेल्या सुनावणीच्या इतिवृत्ताची प्रत दाखल केली असून, त्यावरुन गट नं. ३०९ मध्ये स्मशानभुमीचे बांधकाम करण्यास सिताराम निकम यांनी हरकत घेतल्याचे नमुद असून, जिल्हाधिकारी, सातारा यांनी सदर प्रकरणात

नव्याने चौकशी करुन स्मशानभुमीसाठी गट नं. ३१२ ही जागा योग्य आहे काय, याची निश्चिती करुन गट नं. ३४९ मध्ये बांधण्यात आलेल्या स्मशानभुमीच्या बांधकामाच्या खर्चाची जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश दिले असल्याचे दिसून येते. यावरुन देखील सदर गावात गट नं. ३४९ येथे स्मशानभुमी अस्तित्वात असल्याचे तसेच गट नं. ३१२ मध्ये स्मशानभुमीचे बांधकाम करण्याबाबत चौकशी करुन निर्णय घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असल्याचे दिसून येते. दावा मिळकतीचे पिकपहाणी सदरानुसार दिसून येणारे स्वरुप हे शेतजमीन असे आहे. सदर जमिनीत स्मशानभुमीचे बांधकाम केल्यास दावा मिळकतीचे स्वरुपात बदल होणार आहे. वादी प्रतिवादी यांचेत अगर सुनिलदत्त यादव यांचेत दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झाल्याबाबत व त्यांचे क्षेत्र निश्चित झाल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. जोपर्यत सरसनिरस वाटप होत नाही तोपर्यत प्रत्येक सहमालकाचा सर्व मिळकतीत समाईकात व अविभाज्य हिस्सा व हक्क असतो. जरी दावा मिळकतीत स्मशानभुमी बांधण्याबाबत कोणताही पुरावा व निधी मंजूर झाला नसल्याचे प्रतिवादीचे कथन असले तरी, बक्षिसपत्रातील कथनावरुन सदर जागा स्मशानभुमी बांधण्यासाठी देण्यात आली असल्याचे दिसून येत असल्याने, तुर्तातूर्त ताकिद न दिल्यास व प्रतिवादी यांनी स्मशानभुमीमध्ये बांधकाम केल्यास दावा मिळकतीचे स्वरुप बदलून त्यातील वादीचे समाईकातील हक्कास बाधा निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत पोल रोवून ग्रामपंचायतीचा बोर्ड लावला असल्याचे नि. ३६ येथील अर्जात वादीचे कथन आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जात वादी यांनी कथन केलेल्या त्यांचे हक्कास बाधा येणार असल्याचे कथनास पुष्टी मिळते. सबब, वादी यांनी त्यांना प्रथमदर्शनी केस असल्याचे व तुर्तातूर्त ताकिद न दिल्यास त्यांचे अपरीमित नुकसान होणार असल्याचे पुराव्याने सिध्द केले आहे. करंदी तर्फ कुडाळ या गावात अन्य

स्मशानभुमी उपलब्ध असल्याने, सदर ताकिद दिल्यास प्रतिवादीचे अपरीमित नुकसान होणार नाही. त्यामुळे सोईची बाबही वादीचे बाजूने आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक १ ते ३ यांचे निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत आहेत व वादप्रश्न क्र. ४ करीता पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आदेश**

१. नि. ५ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याखेरीज दावा मिळकतीत स्मशानभुमीचे बांधकाम करु नये व दावा मिळकत दहन विधीसाठी वापरु नये अशी तुर्तातूर्त ताकीद प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादीस देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

(गि.म.साधले)

दिनांकः १५.१२.२०१७

दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर)मेढा.